सोलापूर
तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २२ जुलै २०२६

आतील पानावर

पान २– त्यांच्यामुळे माझं करिअर संपलं?
पान ३– आमच्यात चांगल नातं होतं, पण...
पान ४– सई पल्लवीने नाकारली इंटिमेट सीन्सची ऑफर
पान ५– आदिनाथ –उर्मिलाचा अखेर घटस्फोट!
पान ७– शहनाजचे राघव सोबतच्या नात्यावर मौन




# प्रभासचा 'फौजी' मध्ये खतरनाक लूक

प्रभासच्या आगामी 'फौजी' या चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. 'फौजी' या सिनेमाचं नवं पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं असून त्याने चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. प्रभासने त्याच्या सोशल मीडियावरुन त्याच्या आगामी सिनेमाचं पोस्टर शेअर करत रिलीज डेटही जाहीर केली आहे. या दमदार पोस्टरमध्ये तो रक्ताने माखलेल्या अवस्थेत एका खडकावर बसलेला दिसत आहे. त्याच्या आजूबाजूला मृतदेह विखुरलेले आहेत, तर त्याच्या हातात बंदूक आहे. पोस्टरवर Batnalion Who Fight alone (एक बटालियन जो एकटा लढतो) असे लिहिले असून, चित्रपटाच्या प्रभावी विश्वाची झलक त्यातून पाहायला मिळते. हे पोस्टर शेअर करत प्रभासने कॅप्शनमध्ये अज्ञातपर्व संपले असं म्हटलं आहे.  मैत्री मूव्ही मेकर्सच्या बॅनरखाली निर्मिती झालेला आणि टी-सीरिज फिल्म्स प्रस्तुत प्रभासचा फौजी चित्रपट ३ डिसेंबर २०२६ रोजी जगभरात प्रदर्शित होणार आहे. 'फौजी' च्या माध्यमातून प्रभास 'बाहुबली'नंतर पुन्हा एकदा भव्य पीरियड ड्रामामध्ये पुनरागमन करत आहे. या चित्रपटातील प्रभासचा खतरनाक लूक प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारा आहे. भावनांनी परिपूर्ण कथा आणि नेत्रदीपक दृश्यांनी सजलेला एक सिनेमॅटिक अनुभव हा चित्रपट प्रेक्षकांना देईल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे. 'फौजी' चे दिग्दर्शन हनु राघवपुडी यांनी केले असून, चित्रपटाची निर्मिती मैत्री मूव्ही मेकर्सने केली आहे. नवीन यरनेनी, वाय. रवि शंकर आणि भूषण कुमार हे चित्रपटाचे निर्माते आहेत. 'फौजी' हा चित्रपट ३ डिसेंबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.



# त्यांच्यामुळे माझं करिअर संपलं?





**भा**रतीय संगीतविश्वात स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांची तुलना अनेक वर्षांपासून होत आली आहे. एक काळ असा होता की अनुराधा पौडवाल यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे त्या लतादीदींना पर्याय ठरतील, अशीही चर्चा रंगली होती. त्यानंतर त्यांच्या करिअरमध्ये आलेल्या चढ-उतारांमुळे एक वाद कायम चर्चेत राहिला, 'लता मंगेशकर यांनी अनुराधा पौडवाल यांना पुढे जाऊ दिलं नाही.' या चर्चेवर अनेक वर्षे विविध तर्क-वितर्क मांडले गेले, पण स्वतः अनुराधा पौडवाल यांनी याबाबत कधीही स्पष्ट भूमिका घेतली नव्हती. आता अनेक वर्षांनंतर त्यांनी या वादावर पहिल्यांदाच मनमोकळं भाष्य करत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

एका पॉडकास्ट मुलाखतीत बोलताना अनुराधा पौडवाल यांनी लता मंगेशकर यांच्याबद्दलचा आपला आदर व्यक्त करत या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, गुरूंची बरोबरी कोणीच करत नाही, असं मी मानते. गुरूंना फॉलो केलं जातं, त्यांची पूजा केली जाते. मला त्यांच्याकडून जितकं शिकता आलं, तितकं मी शिकले. त्यानंतर त्या पुढे म्हणाल्या, लोकांचे विचारच असे असतात की ते सतत तुलना करतात. त्यामुळे 'लतादीदींनी मला पुढे जाऊ दिलं नाही', अशी कथा लोकांना खूप मसालेदार वाटते. पण लतादीदींची कला ज्या शिखरावर होती, त्या शिखराजवळ तरी आधी पोहोचलं पाहिजे. त्यानंतरच तुलना होऊ शकते. असं त्या म्हणाल्या. या मुलाखतीत त्यांना लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यापैकी आवडती गायिका कोण? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी कोणताही संभ्रम न ठेवता लता मंगेशकर यांचंच नाव घेतलं आणि त्यांच्याविषयीचा आदर पुन्हा व्यक्त केला. अनुराधा पौडवाल यांनी १९७३ मध्ये आपल्या संगीत कारकिर्दीची सुरुवात केली. १९८० आणि १९९० च्या दशकात त्यांनी बॉलिवूडला अनेक सुपरहिट गाणी दिली. 'आशिकी', 'दिल है कि मानता नहीं', 'बेटा', 'साजन' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या गाण्यांनी लोकप्रियता मिळवली. त्याचबरोबर भक्ती संगीतात त्यांनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं. विशेषतः देवी- देवतांवरील भजने, आरत्या आणि भक्तिगीते घराघरात पोहोचली. अनुराधा पौडवाल यांनी हिंदी, मराठीसह अनेक भाषांमध्ये ९,००० हून अधिक गाणी रेकॉर्ड केली आहेत.

# गांगुलीच्या बायोपिकचं पोस्टर रिलीज!

**भा**रतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि 'दादा' या नावाने लोकप्रिय असलेला सौरव गांगुली हा भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक आहे. 'ऑफ साइडचा किंग' म्हणून ओळखल्या जाणार्‍या सौरव गांगुलीने आपल्या धडाकेबाज फलंदाजीने अनेक विक्रम रचले. याच 'प्रिन्स ऑफ कोलकाता'च्या आयुष्यावर आधारित चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याच्या ५४ व्या वाढदिवशी बायोपिकचं पहिलं पोस्टर रिलीज करण्यात आलं आहे. मात्र, पोस्टरच्या खराब एडिटिंगवरून चित्रपटाला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. सौरवच्या बायोपिकची घोषणा जवळपास ५ वर्षांपूर्वी झाली होती. तेव्हापासून या दिग्गज क्रिकेटपटूच्या भूमिकेत कोण दिसणार? याबद्दल चर्चा सुरू होती. रणबीर कपूरसह अनेक अभिनेत्यांच्या नावाबद्दल सोशल मीडियावर चर्चा रंगायची. पण अखेर पोस्टरमधून गांगुलीच्या भूमिकेत कोण असेल ते स्पष्ट झालं आहे. सौरव गांगुलीच्या क्रिकेट प्रवासावर आधारित चित्रपटाचं नाव 'दादा: द सौरव गांगुली स्टोरी' असं आहे. या चित्रपटात सौरव गांगुलीची भूमिका बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव साकारत आहे. आज सौरव गांगुलीच्या वाढदिवसानिमित्त या चित्रपटाचं पहिलं पोस्टर राजकुमार रावने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर केलं. या पोस्टरमध्ये सौरव गांगुलींचा शर्टलेस सेलिब्रेशनचा लूक रिक्रिएट करण्यात आला आहे. विशेष म्हणजे निर्मात्यांनी चित्रपटाची रिलीज डेटही जाहीर केली आहे. 'दादा' हा चित्रपट १४ मे २०२७ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येईल. 'दादा'ला वाढदिवसाच्या शुभेच्छा असं कॅप्शन लिहून राजकुमार रावने ही पोस्ट केली आहे. राजकुमार रावने हे पोस्टर शेअर केल्यानंतर त्यावर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. काहींना हे पोस्टर आवडलंय, पण काहींना मात्र पोस्टरचं एडिटिंग अजिबात आवडलेलं नाही. 'फार वेळ झालेला नाही, पोस्टर डिलिट करा', 'यापेक्षा तर एआय चांगलं एडिट करतं,' 'राजकुमार राव दादा कमी मुनाफ पटेल जास्त वाटतोय', 'या भूमिकेत राजकुमार राव अजिबात योग्य निवड वाटत नाहीये', 'दादाचे इतके वाईट दिवस नाही आले की त्यांची भूमिका राजकुमार राव करेल,' 'सगळं मिसमॅच वाटतंय,' अशा कमेंट्स या पोस्टरवर पाहायला मिळत आहेत.






# कोरियन चित्रपटात अनुष्का सेन

**अ**भिनेत्री अनुष्का सेनने मोठे यश मिळविले आहे. दक्षिण कोरियन चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारी ती पहिली भारतीय अभिनेत्री ठरणार आहे. २३ वर्षी अनुष्का आगामी रोमँटिक म्युझिकल ड्रामा 'जेजू ओले'मध्ये काम करणार आहे. हा चित्रपट भारत आणि दक्षिण कोरियादरम्यान एक सांस्कृतिक सहकार्याचा प्रोजेक्ट असणार आहे. चित्रपटात अनुष्काने अलीशा नावाची भूमिका साकारली असून ती स्वत:च्या बहिणीला गमाविण्याच्या दु:खातून सावरण्याचा प्रयत्न करत दक्षिण कोरियातील सुंदर बेट जेजूवर पोहोचते. तेथे ती स्वत:च्या भावना समजून घेत आयुष्य सावरण्याचा प्रयत्न करते, तर गायक-गीतकार सुनवू सोबत तिचे नाते जडते. चित्रपटाची कहाणी जेजू बेटाच्या सुंदर ठिकाणांवर आधारित आहे.

दक्षिण कोरियाचा हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांसाठी निर्माण करण्यात आला आहे. तर याचे चित्रिकरण पूर्ण जेजू बेटावर पार पडले आहे. सध्या हा चित्रपट दक्षिण कोरिया, भारत आणि अन्य आशियाई तसेच मध्यपूर्वेतील देशांमध्ये प्रदर्शित करण्याची योजना आहे.





# ऋषभ शेट्टीचा कांतारा ३ येणार

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनय आणि प्रभावी दिग्दर्शनाने वेगळी ओळख निर्माण करणारा राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता ऋषभ शेट्टी सध्या अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे चर्चेत आहे. 'कांतारा'च्या अभूतपूर्व यशानंतर आता त्याने 'कांतारा: चॅप्टर ३'सह आगामी चित्रपटांबाबत महत्वाची अपडेट दिली आहे.

एका मुलाखतीत ऋषभ शेट्टीने सांगितले की, 'कांतारा: चॅप्टर ३ 'च्या स्क्रिप्ट आणि प्री-प्रॉडक्शनचे काम सध्या वेगाने सुरू आहे. अभिनयाइतकाच दिग्दर्शनही त्याच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग आहे. अभिनेता आणि दिग्दर्शकासोबतच निर्माता म्हणूनही तो सक्रिय असून, त्याच्या 'ऋषभ शेट्टी फिल्म्स' या बॅनरअंतर्गत यावर्षीच्या अखेरीस दोन नव्या चित्रपटांची घोषणा करण्यात येणार आहे. दरम्यान, ऋषभ शेट्टी लवकरच दिग्दर्शक प्रशांत वर्माच्या सिनेमॅटिक युनिव्हर्समधील बहुप्रतिक्षित 'जय हनुमान' या चित्रपटात भगवान हनुमानाच्या भूमिकेत झळकणार आहे. या भूमिकेबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता असून, हा चित्रपट त्याच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक मानला जात आहे. याशिवाय ऋषभ शेट्टी 'द प्राईड ऑफ भारत- छत्रपती शिवाजी महाराज' या भव्य ऐतिहासिक चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. ही भूमिका त्याच्या अभिनय कारकिर्दीतील सर्वात प्रतिष्ठेच्या आणि आव्हानात्मक भूमिकांपैकी एक असल्याचे मानले जात आहे. या दोन्ही चित्रपटांच्या चित्रीकरणाबाबत ऋषभने स्पष्ट केले की, 'जय हनुमान' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज' या दोन्ही भूमिकांसाठी वेगवेगळ्या शारीरिक तयारीची आणि लूकची गरज आहे. त्यामुळे दोन्ही चित्रपटांचे शूटिंग एकाच वेळी शक्य नाही.

तो आधी 'जय हनुमान'चे चित्रीकरण पूर्ण करणार असून, त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेसाठी आवश्यक तयारी सुरू करणार असल्याचे त्याने सांगितले. 'कांतारा: चॅप्टर ३'पासून ते 'जय हनुमान' आणि 'द प्राईड ऑफ भारत- छत्रपती शिवाजी महाराज'पर्यंत ऋषभ शेट्टीचे आगामी प्रकल्प चाहत्यांसाठी मोठी पर्वणी ठरणार असल्याची चर्चा सध्या मनोरंजनविश्वात रंगली आहे.

# इम्रान आणि दिशाची रोमँटिक केमेस्ट्री




नुकताच अभिनेता इम्रान हाश्मीचा बहुप्रतीक्षित 'अवारापन २' चा टीझर रिलीज झाला आहे. या चित्रपटाची गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू असून, टीझरने चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. आता या चित्रपटाचं पहिलं गाण देखील रिलीज करण्यात आलं आहे. या गाण्याला चाहत्यांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. 'वे जुनून' या नावाने हे पहिलं गाणं रिलीज करण्यात आलं आहे. या चित्रपटात इम्रान हाश्मी आणि दिशा पटानी पहिल्यांदाच एकत्र दिसत असून दोघांची रोमँटिक केमेस्ट्री चर्चेचा विषय ठरत आहे. सय्यद कादरी यांनी या गाण्याचे गीतलेखन, सुबोध शर्मा यांनी गायन, तर मिथुन यांनी संगीत दिलं आहे. या गाण्यातून प्रेम, विरह आणि जुन्या आठवणींचा भावनिक प्रवास उलगडतो. इम्रानला दिशामध्ये आपल्या पहिल्या प्रेयसी आलियाची झलक दिसते आणि त्यानंतर त्यांच्या नात्याची सुरुवात होताना दाखवण्यात आली आहे. गाणं प्रदर्शित होताच सोशल मीडियावर चाहत्यांच्या भरभरून प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांनी श्रिया सरनच्या फ्लॅशबॅक सीन्सचं कौतुक केलं, तर काहींनी मूळ 'अवारापन' चित्रपटातील गाण्यांची आठवणही काढली आहे. २००७ मध्ये प्रदर्शित झालेला 'अवारापन' सुरुवातीला अपयशी ठरला होता. मात्र, कालांतराने तो एक कल्ट क्लासिक चित्रपट ठरला आणि त्यातील गाणी आजही चाहत्यांच्या पसंतीस उतरतात. 'अवारापन २' चे दिग्दर्शन नितीन कक्कर यांनी केले असून, इम्रान हाश्मी, दिशा पटानी आणि शबाना आझमी प्रमुख भूमिकेत आहेत. हा चित्रपट १४ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातून इम्रानच्या जुन्या चित्रपटातील आठवणी पुन्हा पाहायला मिळणार असल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली आहे.

# आमच्यात चांगलं नातं होतं, पण...

कलाकार त्यांच्या आयुष्यात पुढे गेले तरीही त्यांच्या भूतकाळाबद्दल, त्यांच्या रिलेशनशिपबद्दल सतत चर्चा होत असते. अनेकदा स्वत: कलाकार त्याबद्दल बोलत असतात. आता संजय खान व झरीन खान यांची मुलगी फराहने बॉबी देओल व तिच्या नात्याबद्दल वक्तव्य केले आहे. फराह एका मुलाखतीत म्हणाली, आम्ही लहानपणीचे मित्र आहोत. मला तो आवडायचा. त्याला मी आवडायचे आणि आमच्यात इतकंच नातं होतं. आम्ही एकमेकांना पत्र लिहायचो; पण आम्ही एकमेकांना डेट करायचो नाही. मी १६ वर्षांची होते, तो १७ वर्षांचा होता. ही ४० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. पुढे बॉबी देओल आणि त्याची पत्नी तान्या यांच्याबरोबर कसे नाते आहे, याबद्दलही फराहने वक्तव्य केले. ती म्हणाली, आज तो माझ्या सर्वात जवळच्या मित्रांपैकी एक आहे. त्याची पत्नी तान्यासुद्धा माझी जवळची मैत्रीण आहे. ते माझ्यासाठी कुटुंबासारखे आहेत आणि मी त्या दोघांसाठी काहीही करायला तयार आहे. मला खूप आनंद आहे की, ते एकमेकांचे जोडीदार आहेत. कारण- ते एकमेकांसाठी अगदी योग्य आहेत. बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्याआधी बॉबी देओल नीलम कोठारीसह रिलेशनशिपमध्ये होता. १९९० च्या सुरुवातीला ते वेगळे झाले. मात्र, नीलम आणि बॉबी यांच्यात जवळीक निर्माण झाल्यानंतर फराह त्याच्यापासून दूर गेली, अशा अफवा पसरल्या होत्या. त्यावर ती म्हणाली की आमच्यातील जे बॉण्डिंग होते, ते संपले होते. त्यानंतर नीलम व बॉबी यांच्यात जवळीक वाढली होती. त्यामुळे नीलममुळे आमचे ब्रेकअप झाले या चर्चांमध्ये काही तथ्य नाही. फराह असेही म्हणाली की, मला प्रामाणिकपणा जपायला आवडतो आणि मी माझ्या आयुष्याबद्दल कायमच मोकळेपणाने बोलत असते. नीलम कोठारीने एका मुलाखतीत खुलासा केला केला होता की, तिने बॉबी देओलबरोबरचे नाते कोणत्याही कौटुंबिक विरोधामुळे तोडले नव्हते. दरम्यान, फराहच्या कामाबद्दल बोलायचे, तर ती लोकप्रिय ज्वेलरी डिझायनर आहे. ती हृतिक रोशनची एक्स पत्नी सुझेन खानची बहीण आहे. ती म्हणाली की, आजच्या काळात एखाद्या व्यक्तीकडे दमदार कल्पना असेल तर ती त्याची सर्वात मोठी संपत्ती ठरू शकते. योग्य संधी मिळाल्यास कोणताही नवोदित कलाकार किंवा चित्रपट निर्माता यशस्वी होऊ शकतो. त्यामुळे नव्या पिढीने आत्मविश्वासाने पुढे येऊन आपल्या कल्पनांवर काम करावे, असा संदेशही तिने दिला.





# सई पल्लवीने नाकारली इंटिमेट सीन्सची ऑफर

अनेकदा बिग बजेट चित्रपटांचा भाग होण्यासाठी अभिनेत्री त्यातील बोल्ड सीन्स करायलाही होकार देतात. पण सिनेसृष्टीतल्या अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्यांनी नो किसिंग पॉलिसी पाळली आहे. अशीच एक अभिनेत्री म्हणजे साई पल्लवी. साऊथची लोकप्रिय अभिनेत्री आणि 'रामायण' चित्रपटाची नायिका सई पल्लवी इंटिमेट आणि बोल्ड सीन्स न करण्यामागचं कारण सांगितलंय. साई पल्लवीला एका मुलाखतीत विचारण्यात आले होते की, तिला दिग्दर्शकांनी कधी किसिंग सीन्ससाठी विचारले आहे का? यावर उत्तर देताना ती म्हणाली. हो, अनेक दिग्दर्शकांनी मला अशा सीन्ससाठी विचारले आहे आणि आजही असे ऑफर्स येतात.

मी अशा प्रकारचे सीन्स करत नाही हे माहीत असूनही मला विचारले जाते. साई पुढे म्हणाली, जर माझा बॉयफ्रेंड असेल, तर मी स्क्रीनवर किंवा खऱ्या आयुष्यात दुसऱ्या कोणालाही किस कशाला करु? प्रत्येकाला आपलं कुटुंब सुखी असावं अशी इच्छा असते. प्रत्येकाला एक कार, एक घर हवं असतं जेणेकरून आयुष्य सुखात जाईल. माझ्याकडे हे सर्व काही आहे. दुसरी गाडी खरेदी करण्यासाठी मला स्क्रीनवर कोणाला किस करण्याची गरज नाही. माझ्याकडे जे काही आहे त्यात मी आनंदी आहे. जर तुम्हाला माझ्याकडून फक्त अभिनय करून घ्यायचा असेल तर मला तुमच्या चित्रपटात घ्या, पण जर इंटीमेट सीन्स असतील तर तुम्ही दुसऱ्या कोणालाही कास्ट करू शकता, असे ती निर्मात्यांना सांगते. सई पल्लवीच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले, तर तिचे चाहते नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटात ती माता सीतेची भूमिका साकारत असून अभिनेता रणबीर कपूर प्रभू श्रीरामांच्या भूमिकेत दिसणार आहे. तर साउथ सुपरस्टार यश रावण साकारणार आहे.

# ज्यू. एनटीआर करणार राजकारणात प्रवेश?

अभिनेता थलापती विजय हा तामिळनाडूचा मुख्यमंत्री झाला. आता त्याच्याच पावलावर पाऊल ठेऊन दाक्षिणात्य सिनेसृष्टीचा सुपरस्टार आणि RRR फेम ज्युनिअर एनटीआर राजकारणात जाणार अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियामध्ये रंगली होती. अभिनेता लवकरच राजकारणात पाऊल टाकणार असून त्याला एका मोठ्या राजकीय पक्षाची ऑफर आहे, अशाही चर्चांना उधाण आले. मात्र, आता ज्युनिअर एनटीआरच्या अधिकृत टीमने या सर्व चर्चांना पूर्णविराम देऊन खरं काय ते सांगितलं आहे. अभिनेत्याच्या टीमने सांगितले की, कार्यक्रमात कोणताही राजकीय अजेंडा नसणार आहे. या कार्यक्रमात 'ऊरु वाडा' योजनेची ओळख करु दिली जाणार आहे. ही योजना एक नवा सामाजिक उपक्रम आहे. त्यामुळे ज्युनिअर एनटीआरच्या टीमने लोकांना आवाहन केले आहे की, त्यांनी दिशाभूल करणाऱ्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये. यासोबतच, टीमने सोशल मीडिया युजर्सनाही विनंती केली आहे की, त्यांनी या सामाजिक कार्यक्रमाला राजकीय रंग देऊन अफवा पसरवू नये. निवेदनात स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, 'ऊरु वाडा' ही पूर्णपणे राजकीय नसलेली एक सामाजिक मोहीम आहे. सध्या ज्यु. एनटीआर 'ड्रॅगन' या बहुप्रतीक्षित ॲक्शन थ्रिलर चित्रपटावर काम करत आहे. या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे.





# मराठमोळी अभिनेत्री गाजवतेय दाक्षिणात्य सिनेमा

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारे अनेक मराठी कलाकार आपण पाहिले आहेत. याच यादीत सध्या आघाडीवर असणारे एक नाव म्हणजे अभिनेत्री भाग्यश्री बोरसे. भाग्यश्री सध्या तिच्या 'लेनिन' या आगामी तेलुगू चित्रपटामुळे चांगलीच चर्चेत आहे. या चित्रपटात ती दाक्षिणात्य सुपरस्टार नागार्जुन यांचा मुलगा अखिल अक्किनेनी याच्यासोबत मुख्य नायिकेच्या भूमिकेत स्क्रीन शेअर करत आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये जन्मलेल्या भाग्यश्रीचा एक मराठी मुलगी ते दाक्षिणात्य सुपरस्टार होण्याचा प्रवास सोपा नव्हता. नुकतंच भाग्यश्री बोरसेने एका मुलाखतीत बालपणी परदेशात गेल्यानंतर इंग्रजी भाषा न येत असल्यामुळे सहन करावा लागलेला मानसिक त्रास आणि त्यातून मिळालेला आत्मविश्वास याबद्दल सांगितलं. सुरुवातीला भाग्यश्री छत्रपती संभाजीनगरमधील एका मराठी माध्यमाच्या शाळेत शिकत होती. त्यामुळे तिला फक्त मराठी आणि हिंदी या दोनच भाषा येत होत्या. त्यानंतर तिच्या वडिलांना नायजेरियात नोकरीची संधी मिळाली आणि तिचे कुटुंब तिथे स्थलांतरित झाले.

नायजेरियात गेल्यावर इंग्रजी येत नसल्यामुळे भाग्यश्रीला मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.भाग्यश्री म्हणाली, हा बदल माझ्यासाठी खूप कठीण होता. मला अजिबात इंग्रजी बोलता येत नव्हतं. हा अनुभव फक्त तिच्यापुरता मर्यादित नव्हता. वाढत्या वयात जवळपास प्रत्येक मुलाला कोणत्या न कोणत्या प्रकारच्या बुलिंगचा, समस्येचा सामना करावा लागतो. लहानपणी आपण सगळेच अशा अडचणींमधून जातो. आपल्या दिसण्यावरून, बोलण्याच्या पद्धतीवरून, भाषा न येण्यावरून किंवा अभ्यासात कमी असल्यामुळे आपल्याला कमी लेखलं जातं, त्रास दिला जातो. मात्र, भाग्यश्रीने या नकारात्मक अनुभवामुळे स्वतःला खचू दिले नाही.

या प्रसंगाकडे सकारात्मकतेने पाहत ती म्हणाली, आजूबाजूचा नकारात्मक आवाज दुर्लक्षित करून आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करणं महत्त्वाचं आहे. हा प्रवास कठीण आणि वेदनादायक असतो, पण हाच त्रास तुम्हाला मजबूत बनवतो भाग्यश्री म्हणाली, खरं सांगायचं तर, जर त्या मुलांनी माझ्या इंग्रजीवरून माझी चेष्टा केली नसती, तर आज माझे इंग्रजी इतके उत्तम झाले नसते. मी ते सुधारण्याचा कधी प्रयत्नच केला नसता.

# ‘समर्थ’चा टीझर प्रदर्शित

समर्थ रामदास स्वामींच्या प्रेरणादायी विचारांना आजच्या काळाशी जोडणाऱ्या ‘समर्थ’ या आगामी मराठी चित्रपटाचा बहुप्रतीक्षित टीझर प्रदर्शित झाला असून, त्याने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. आधुनिक जीवनातील धावपळ, कुटुंबातील मतभेद आणि अध्यात्मातून जीवनाला मिळणारी नवी दिशा यांची भावस्पर्शी झलक या टीझरमधून पाहायला मिळते. टीझरमध्ये एका सामान्य कुटुंबाच्या आयुष्यात घडणारे अनपेक्षित वळण उलगडताना दिसते. एका बाजूला अध्यात्माकडे झुकणाऱ्या वडिलांचा प्रवास, तर दुसऱ्या बाजूला आधुनिक विचारसरणी असलेल्या मुलाचा त्याला असलेला विरोध- या दोन पिढ्यांतील संघर्ष अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. समर्थ रामदास स्वामींचे विचार हे केवळ धार्मिकतेपुरते मर्यादित नसून, जीवन जगण्याची योग्य दिशा देणारे आहेत, हे टीझर सूचकपणे अधोरेखित करतो. या विचारांचा या कुटुंबावर नेमका काय परिणाम होईल? वडील आणि मुलामधील दुरावा कमी होईल का? समर्थांच्या शिकवणीतून त्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळेल का? या सर्व प्रश्नांची उत्तरे चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रेक्षकांना मिळणार आहेत. दिग्दर्शक योगेश फुलफगर म्हणतात, ‘समर्थ’ हा चित्रपट आजच्या पिढीसमोर उभ्या असलेल्या प्रश्नांची उत्तरे समर्थ रामदास स्वामींच्या विचारांतून शोधण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. परंपरा आणि आधुनिकतेचा समतोल साधणारी ही कथा प्रत्येक कुटुंबाला स्वतःची वाटेल, असा आम्हाला विश्वास आहे. निर्माते रविंद्र पाठक म्हणाले, अध्यात्म, नाती आणि जीवनमूल्ये यांचा सुंदर समतोल साधणारी ही कथा प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल. प्रत्येक कुटुंबाला आणि प्रत्येक पिढीला स्वतःकडे नव्या नजरेने पाहायला भाग पाडणारा हा चित्रपट ठरेल, असा मला विश्वास आहे. ‘समर्थ’ हा बहुप्रतीक्षित मराठी चित्रपट १४ ऑगस्ट रोजी संपूर्ण चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. समर्थ रामदास स्वामींच्या विचारसंपदेचा आधुनिक संदर्भात घेतलेला हा प्रेरणादायी प्रवास प्रेक्षकांना नक्कीच अंतर्मुख करेल. या चित्रपटात भूषण प्रधान, पुष्कराज चिरपुटकर, शर्वरी जमेनिस, हार्दिक जोशी, ईशा केसकर, प्रसाद खांडेकर, राजन भिसे, यतिन कार्येकर, दिशा परदेशी आणि निखिल राऊत यांच्या प्रमुख भूमिका आहेत.




# आदिनाथ- उर्मिलाचा अखेर घटस्फोट!

लोकप्रिय मराठी अभिनेता आदिनाथ कोठारे व अभिनेत्री उर्मिला कानेटकर यांच्या वैवाहिक आयुष्यात वादळ आल्याच्या चर्चा गेल्या काही वर्षांपासून सोशल मीडियावर सुरू होत्या. मात्र, इतके दिवस आदिनाथ अथवा उर्मिला या दोघांपैकी कोणीही यावर भाष्य केलं नव्हतं. या सगळ्या चर्चा खऱ्या ठरल्या असून, अखेर इन्स्टाग्रामवर संयुक्तरित्या पोस्ट शेअर करत आदिनाथ- उर्मिलाने विभक्त होणार असल्याचा निर्णय जाहीर केला आहे. तसेच या कठीण काळात सर्वांनी प्रायव्हसची आदर करावा असंही त्यांनी म्हटलं आहे. घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला असला, तरीही लेक जिजाचं संगोपण ते एकत्र, पूर्ण जबाबदारीने करणार आहेत. शेअर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, आमचे मित्र, मीडिया आणि हितचिंतकांनो, खूप विचार केल्यानंतर एकमेकांच्या संमतीने आणि सामंजस्याने आम्ही (आदिनाथ आणि उर्मिला) पती-पत्नी म्हणून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. जोडीदार म्हणून आमचा प्रवास इथे संपत असला, तरी आमची मुलगी जिजा हिच्यासाठी आम्ही नेहमी एकत्र आहोत. ती आमचं सर्वस्व आहे. तिला भरपूर प्रेम, सुरक्षितता आणि पाठिंबा मिळावा, यासाठी आम्ही पूर्ण जबाबदारीने एकत्र येऊन तिचे संगोपन करत आहोत. आमच्या मनात एकमेकांबद्दल आणि एकत्र घालवलेल्या वर्षांबद्दल नेहमीच आदर राहील. गेल्या काही वर्षांत मीडियाने आणि चाहत्यांनी आम्हाला जे भरभरून प्रेम आणि साथ दिली आहे, त्यासाठी आभारी आहोत. आयुष्याच्या या नव्या टप्प्यावरही तुमचं हे प्रेम आणि आशीर्वाद आमच्या पाठीशी असेच राहतील, अशी आम्हाला आशा आहे. म्हणूनच, आमच्या या खासगी प्रवासात मीडिया आणि जनतेने आमच्या प्रायव्हसीचा आदर करावा, अशी नम्र विनंती आहे. या विषयावर आमचे एकमेव वक्तव्य असेल आणि यापुढे आम्ही यावर कोणतीही कमेंट किंवा चर्चा करणार नाही. तुमचं प्रेम आणि समजूतदारपणाबद्दल मनापासून धन्यवाद. गेल्या काही दिवसांपासून उर्मिला ही कोठारे कुटुंबातून विभक्त राहत असल्याची चर्चा सुरू होती. याशिवाय ती आदिनाथच्या ‘पाणी’ सिनेमाच्या प्रीमियरला सुद्धा गैरहजर होती. त्यामुळे या दोघांच्या वैवाहिक जीवनाबद्दल बऱ्याच चर्चा सुरू होत्या. २० डिसेंबर २०११ रोजी ही जोडी विवाहबद्ध झाली होती आणि आता लग्नानंतर १५ वर्षांनी आदिनाथ-उर्मिलाने विभक्त होणार असल्याचं जाहीर केलं आहे.



# रिंकूला बनायचंय दिग्दर्शक!

मराठी सिनेविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री रिंकू राजगुरूने आपल्या दमदार अभिनयाने कमी वयामध्ये स्वतंत्र ओळख निर्माण केली. ‘सैराट’ सिनेमातील तिची आर्ची ही भूमिका प्रचंड गाजली होती. या भूमिकेने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. अभिनयात यश मिळवल्यानंतर आता रिंकूने आणखी एका क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने प्रदर्शित झालेल्या ‘बाप विठुराया’ या गाण्याच्या निमित्ताने तिने तिच्या या नव्या स्वप्नाबद्दल सांगितले आहे. रिंकू राजगुरू हिचे ‘बाप विठुराया’ हे गाणे प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे. अजय गोगावले यांनी गायलेल्या या गाण्यावर तिने प्रभावी अभिनय केला आहे. आषाढी वारीमध्ये आलेलं हे गाणं प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले आहे. तिच्या अभिनयाचे सर्वांनी कौतुक केले आहे. अभिनेत्री म्हणून तिने साकारलेल्या भूमिका प्रेक्षकांना आवडल्या आहेत. पण, आता अभिनयासह तिला सिनेविश्वामध्ये आणखी एक काम करायचे असल्याचे रिंकूने स्पष्टपणे सांगितले. रिंकू राजगुरूने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिच्या अभिनयासह भविष्यातील दुसऱ्या करिअरविषयीही मनमोकळेपणाने भाष्य केले. कॅमेऱ्यासमोर अभिनय करताना प्रेक्षकांची मनं जिंकणाऱ्या रिंकूला कॅमेऱ्यामागे कोणतं काम करायला आवडेल, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर तिने दिग्दर्शनाची विशेष आवड असल्याचे सांगितले. ती म्हणाली, मला दिग्दर्शन प्रचंड आवडतं. कारण मी सेटवर माझा शॉट झाला आणि काम झालं की दिग्दर्शन कसं करतात हे शिकत असते. पुढे ती म्हणाली, सेटवर जिथे दिग्दर्शक आणि त्यांची पूर्ण टीम बसलेली असते, मी तिथे जाऊन बसते आणि त्यांचं बोलणं ऐकत असते. आता टीम कोणतं काम करणार आहे हे लक्षात घेते. जर ते वेगवेगळ्या कल्पना वापरून क्रिएटिव्ह काही काम करत असतील तर ते करायला मला खूप आवडतं. दिग्दर्शन हे मला खूप आवडतं. माझं काम झाल्यानंतर सेटवर बसून मला तिथे काम करणाऱ्या लोकांचं निरीक्षण करायला आवडतं. यामुळे प्रत्येकाची कामाची पद्धत लक्षात येते आणि दरवेळी काहीतरी नवीन शिकायला मिळतं.



*'दिन है सुहाना आज पहली तारीख है खुश है जमाना आज पहली तारीख है...' अद्भुत प्रतिभा असलेला कलाकार त्याच्या कलेतील कुठल्याही प्रकारचा तितकाच प्रभावी ठरतो. भक्ती, भाव, प्रणय व विरहगीत एवढ्यापुरतीच आपली संगीत कला सीमित नाही, हे सुधीर फडके या ज्येष्ठ-श्रेष्ठ संगीतकाराने या गाण्याद्वारे किशोर कुमार यांच्यासाठी उडत्या, नटखट, प्रभावी व विनोदी ढंगाच्या गाण्याची निर्मिती करून सिद्ध केले. बाबूजींच्या (सुधीर फडके) कारकीर्दीतील हा आगळावेगळा परमोत्कर्ष बिंदूच ठरला. प्रत्येक कडव्याच्या शेवटी 'करो ना बहाणा, पैसा जरा लाना, मुझे ना सुनाना, खिलौने जरा लाना' इत्यादी गद्यरूपी स्वरांना विस्मयाने प्रदर्शित करून विनोदी प्रसंग अजून गडद केला. १९५४ सालच्या पहली तारीख मधले हे गाणे कित्येक वर्षे रेडिओ सिलोनच्या प्रत्येक महिन्याच्या १ तारखेच्या सकाळी ७.३० च्या कार्यक्रमातील पहिले गाणे असायचे. असा तो काळ होता...*

# ज्योती कलश छलके: सुधीर फडके



**ज्योती कलश छलके। ज्योती कलश छलके हुए गुलाबी लाल सुनहरे। रंग दल बादल के'**

१९६१ च्या 'भाभी की चुडिया' मधील हे केवळ एक सिनेगीत नसून प्रभातकालाचे अजरामर छायावादी काव्य नरेंद्र शर्मा या कवीच्या सृजनाचे प्रतीक आहे. गाण्याच्या सुरुवातीलाच बाबूजींनी बासरीच्या सुरेल सुरांचं मोहोळ उठवून प्रकृतीच मनमोहक रूप साकार केले. '**ज्योती यशोदा धरती गया। नील गगन गोपाल कन्हैया। श्यामल प्रतिमा झलके। ज्योती कलश छलके।।**' 'ज्योती यशोदा धरती गैया' चे प्रतीकात्मक रूप निसर्गाशी जोडून कवीने प्रतिभा विलास साधला. लता यांच्या स्वराला बाबूजींनी भूपाली रागात बांधून बासरी-सतारसारख्या सुमधुर वाद्यांचा मोजका पण प्रभावी वापर करून शब्दकळा सुमधुर रागिणीत परिवर्तित केली व गाणे अजरामर ठरले.

**'बांधे प्रीती फूल डोर। मन लेके चित चोर। दूर जाना ना मन के किवाड खोल। गीत मेरे अनमोल। भूल जाना ना'**

१९५२ साली कलकत्यातील संगीत रजनीत १९५१ च्या 'मालती माधव' चित्रपटातील जयजयवंती रागातील लता यांनी गायलेली ही रागिणी ऐकल्यावर बडे गुलाम अली खांसाहेब म्हणाले, 'लता तो खुदा की देण है। उससे तीन- चार मिनट मे अपने कलागतीसे इस तरह आलापी के साथ गवा लेना। कोई बड़े मुसिकारही कर सकते है।' त्यातील 'दूर जाना ना' व 'भूल जाना ना' या दोन्ही ओळी प्रत्येकी दोन वेळा म्हणताना, बाबूजीनीजी फिरक देऊन म्हणवून घेतले, ही करामत काही औरच आहे. सुधीर फडके यांनी २१ हिंदी चित्रपटांना सुमधुर संगीत दिले होते, हे फारच थोड्यांना माहिती असेल. 'हाय मेरी दैया। जिया घबराये...' आगे बढो- १९४७. 'कबीराचे शेले विणतो...' यासारख्या पावित्र्य निर्मित गाण्याच्या गायिका माणिक वर्मा हिंदी चित्रपटात वरील गाण्यात चक्क मुजरा नाजुक ठसक्यात सादर करतात, हे सांगूनही खरे वाटणार नाही. परंतु बाबूजींनी हा चमत्कार करून दाखविला व माणिक वर्माच्या गळ्यातून ही कळा बाहेर काढली. माणिक वर्मा यांनी गायलेले हे गाणे त्यांचे पती कवी अमर वर्मा यांनी लिहिले होते. असा हा पहिलाच प्रसंग असेल.

'**तू कहाँ चली कुछ बोल। नदी की धारा मुझको तो मिला किनारा...** ' रत्नाघर - १९५५ नदीच्या प्रवाहाला उद्देशून छद्मीपणे प्रश्न करताना 'तू कहाँ... बोल' म्हणताना 'बोल' हे शब्द लता यांच्याकडून ज्या नजाकतीने गाऊन घेतला तो ऐकताना कान तृप्त होतात. अस्सल संगीतकाराने विणलेली स्वरांची बारीक वीण जाणकाराच्या नजरेत भरते. बाबूजींच्या अनेक गाण्यात अशा नाजूक स्वरांच्या क्लुप्त्या आढळतात. 'किस्मत का नही दोष बावरे। दोष नही भगवान का... 'सजनी- १९५६. सुधीर फडके व लता मंगेशकर यांनी गायलेले हे सांघिक गीत आहे. सुधीर यांच्या आर्त स्वरात सर्व अंतरे असून हे संकेतात्मक भजनसदृश गीत कर्ण तृप्ती देते. '**दुख देना इन्सान को जगमे। काम रहा इन्सान का...**' लता व सुधीर मिळून या वरील दोन ओळी सांघिक म्हणून गाण्याला लज्जत देतात. यात लता यांचा आवाज केवळ युगल स्वरांसाठीच वापरला आहे. बाबूजींच्या हिंदी चित्रपट संगीतातील दिग्विजयातील वरील निवडक गाण्यांचा उल्लेख केल्याने प्रेक्षकांच्या स्मृतीचे दरवाजे उघडतील. परंतु अशा गाण्यांचे जन्मदाते हिंदी चित्रपट संगीतात उपेक्षेच्या गर्तेत फेकले गेले अन्यथा मराठी संगीताप्रमाणे हिंदीतही त्यांचे नाव उच्चपदी असते. २५ जुलै १९१९ रोजी राम विनायक फडके यांचा जन्म कोल्हापुरात झाला. वामनराव पाध्ये या गुरुवर्याकडून शास्त्रीय संगीताची दीक्षा घेतली. १९४१ साली एचएमव्हीसाठी सर्वप्रथम गाणे संगीतबद्ध केले व सुधीर फडके हे नाव धारण केले. १९४५ साली स्नेहल भाटकर यांच्या सोबत 'रुक्मिणी स्वयंवर' या हिंदी व मराठीतून प्रदर्शित चित्रपटास संगीत दिले. १९४६ साली प्रभातमध्ये प्रवेश मिळाला. चक्क चार हिंदी चित्रपटाना संगीत दिले. १९४९ साली ललिता देऊळकर यांच्यासोबत विवाह झाला. १९५० साली श्रीधर फडके यांचा जन्म झाला. ९० मराठी व २१ हिंदी चित्रपटास संगीत दिले. १९५५ साली गदिमांच्या 'गीत रामायण' या काव्याला संगीत दिले व हे काव्य अजरामर केले. आझाद गोमंतक दलाचे सदस्य होऊन दमन, दीव व दादरा नगर हवेली हे प्रांत पोर्तुगीजांच्या दास्यातून मुक्त केले. 'वीर सावरकर' हा चित्रपट, निर्मिती व संगीत देऊन २००१ साली प्रदर्शित केला. त्यांना खालील पुरस्कार मिळाले. मराठी सर्वोत्कृष्ट फिचर फिल्मसाठी (१) राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार- १९६३. (२) संगीत नाटक अकादमी पुरस्कार- १९९१. (३) सह्याद्री स्वररत्न पुरस्कार- २००२. या थोर संगीतकार, गायक व देशभक्ताचे निधन २९ जुलै २००२ साली मुंबईत झाले व एक बहुश्रुत जीवन समाप्त झाले. गीत रामायणातले बोल खरे ठरले...' पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा...'

**रमेश पोफळी**

# प्रिया मराठेची 'ती' इच्छा अपूर्णच!

मराठी अभिनेत्री प्रिया मराठेच्या अकाली निधनाने संपूर्ण मनोरंजन विश्वाला मोठा धक्का बसला होता. कर्करोगाशी धैर्याने झुंज देत असताना तिने अखेरचा श्वास घेतला; मात्र तिच्या आठवणी आजही चाहत्यांच्या मनात कायम आहेत. तिच्या या आजारपणाच्या काळात तिला पती शंतनू मोघेने खंबीरपणे साथ दिली. अभिनेता शंतनू मोघे याने पुन्हा एकदा प्रियाच्या आठवणींना उजाळा दिला आहे. तसेच पहिल्यांदा प्रियाच्या एका अपूर्ण राहिलेल्या स्वप्नाचा उल्लेख केला आहे. शंतनूने एका मुलाखतीमध्ये त्याचे वैयक्तिक आयुष्य आणि सिनेविश्वातील अनुभव शेअर केले. तो म्हणाला, वडिलांच्या ओळखीमुळे नक्कीच मला निर्मात्यांचे नंबर मिळाले आणि माझा संपर्क वाढला. ज्या निर्मात्यांकडे जायचं होतं, ते वडिलांमुळे थोडं सहज झालं. त्यातही वडिलांनी फोन केला असता, तर सुरुवातीला एखादं काम मिळालं असतं; पण मला निर्मात्यांच्या डोळ्यात माझ्याविषयी विश्वास निर्माण करायचा होता. कारण- मी काम करू शकतो, असं समोरच्यालाही वाटायला हवं. जर मला आयुष्यभर हेच करिअर करायचे असेल, तर निर्मात्यांच्या डोळ्यांत एक विश्वास दिसायला हवा. पुढे तो म्हणाला, मी, माझे वडील, काका आणि बायको याच क्षेत्रातील असल्यामुळे सगळ्यांना या क्षेत्राबद्दल माहित होती. पुन्हा घरी आल्यावर त्यावर काय बोलणार म्हणून आम्ही वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारायचो. माझं काम अनेकदा थांबत होतं आणि पुन्हा सुरू व्हायचं. जी काही कामं केली, ती खूप चांगली केली. पण जेव्हा नव्हतं तेव्हा घरी बसलो होतो. खूप काळ असा होता, जेव्हा काहीच काम हातामध्ये नव्हतं; पण मी आणि प्रियामध्ये यावरून कधीच वाद झाले नाहीत. या सगळ्यामध्ये प्रियाचा खूप मोठेपणा आहे. ती खूप सुंदर आणि समजूतदार व्यक्ती होती. तिनं सांभाळून घेतलं, नाही तर हे साध्या माणसाचं काम नाहीये. ती माझी बायको होती म्हणून नाही, तर तिनं खरंच खूप साथ दिली, पुढे शंतनूने बायको प्रिया मराठेची अपूर्ण राहिलेली इच्छा बोलून दाखवली. त्याने, प्रियाचं एक स्वप्न अपूर्ण राहिलं आहे आणि ते म्हणजे प्रोड्युसर होण्याचं. ते मी नक्की पूर्ण करेन, असे म्हणत शंतनू मोघे याने सिनेविश्वामध्ये निर्मिती क्षेत्रामध्ये उतरण्याची इच्छा व्यक्त केली आहे. एका नाटकाच्या निमित्ताने शंतनू मोघे व प्रिया मराठे यांच्या नात्याची सुरुवात झाली होती. एकत्र काम करताना दोघांमध्ये मैत्री निर्माण झाली आणि कालांतराने त्या मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाले. अनेक वर्षे एकमेकांना समजून घेतल्यानंतर त्यांनी २०१२ मध्ये विवाह केला. प्रिया मराठेचे अवघ्या ३८ व्या वर्षी ३१ ऑगस्ट २०२५ रोजी कर्करोगामुळे निधन झाले.



# 'रागिनी ३'च्या शूटिंगला सुरुवात

अभिनेत्री तमन्ना भाटिया सध्या तिच्या आगामी 'रागिनी ३' या थ्रिलर चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटातील तिची एंट्री यापूर्वीच निश्चित झाली होती. आता शूटिंगलाही सुरुवात झाली असून, तमन्नाने सोशल मीडियावर सेटवरील खास फोटो शेअर करत चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली आहे. तमन्नाने तिच्या इन्स्टाग्रामवर 'रागिनी ३'च्या सेटवरील क्लॅपबोर्डचा फोटो शेअर केला आहे. यावरून चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाल्याचे स्पष्ट झाले आहे. तिच्या या पोस्टने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'रागिनी ३'चे दिग्दर्शन लेखक आणि निर्माता शशांक घोष करत आहेत. त्यांनी यापूर्वी वीरे दी वेडिंग, खूबसूरत, फ्रेडी आणि क्विक गन मुरुगन यांसारख्या वेगवेगळ्या धाटणीच्या चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. त्यामुळे 'रागिनी ३'कडूनही प्रेक्षकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. या चित्रपटाची निर्मिती एकता कपूर करत आहेत. 'रागिनी एमएमएस' फ्रँचायझीचे पहिले दोन भागही त्यांनीच निर्मित केले होते. आता या मालिकेतील तिसरा भाग 'रागिनी ३'च्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाची कथा नेमकी काय असेल, याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. चित्रपटातील इतर कलाकारांची संपूर्ण यादीही अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, रिपोर्ट्सनुसार जुनैद खान, नरगिस फाखरी आणि आयुष शर्मा हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसू शकतात. निर्मात्यांकडून याबाबत अधिकृत घोषणा होण्याची चाहत्यांना प्रतीक्षा आहे. तमन्नाने गेल्या काही वर्षांत हिंदी, तमिळ आणि तेलुगू चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध प्रकारच्या भूमिका साकारत तिने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता हॉरर-थ्रिलर शैलीतील 'रागिनी ३'मध्ये ती कोणत्या भूमिकेत दिसणार, याची उत्सुकता आहे. 'रागिनी एमएमएस' मालिकेचे आधीचे दोन्ही भाग प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले होते. रहस्य, भीती आणि थरार यांचा संगम असलेल्या या फ्रँचायझीला मोठा चाहतावर्ग आहे. त्यामुळे तिसऱ्या भागाकडूनही अपेक्षा आहेत. दरम्यान, तमन्नाने शेअर केलेल्या एका साध्या फोटोनेही सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगवली आहे. अनेक चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत असून, लवकरच निर्मात्यांकडून स्टारकास्ट, कथा आणि प्रदर्शनाच्या तारखेबाबत माहिती जाहीर होण्याची शक्यता आहे.

# शहनाजचे राघव सोबतच्या नात्यावर मौन





'बिग बॉस'मधून घराघरांत पोहोचलेली शहनाज गिल बॉलीवूडच्या लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. अभिनयाबरोबरच तिचं वैयक्तिक आयुष्यही अनेकदा चर्चेचा विषय ठरतं. गेल्या काही दिवसांपासून अभिनेता राघव जुयालबरोबर तिच्या नात्याच्या चर्चांना सोशल मीडियावर उधाण आलं आहे. दोघांचा हातात हात घालून फिरताना व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर डेटिंगच्या चर्चांना उधाण आले आहे. अखेर त्यांच्या नात्यावर शहनाज गिलने पहिल्यांदाच प्रतिक्रिया देत तिची भूमिका मांडली आहे. एका मुलाखतीमध्ये शहनाज गिलने कामासह वैयक्तिक आयुष्याबाबत गप्पा मारल्या आहेत. सिनेविश्वातील अनुभव सांगत तिने अनेक गोष्टींचा उलगडा केला. मात्र, राघव जुयाल आणि तिच्या नात्याबाबत प्रश्न विचारताच शहनाज म्हणाली, वैयक्तिक प्रश्न विचारू नका. मी फक्त एवढंच सांगेन की, लवकरच त्याचा 'भाई तेरा स्टार है' चित्रपट प्रदर्शित होत आहे, त्यामुळे त्याला भरभरून पाठिंबा द्या. त्याचा चित्रपट हिट होणं खूप महत्त्वाचं आहे. पहिल्यांदाच तो मुख्य अभिनेता म्हणून काम करतोय, त्यामुळे त्याला आपल्या सर्वांचा पाठिंबा मिळणं खूप महत्त्वाचं आहे. शहनाज गिल राघव जुयालच्या वाढदिवसानिमित्त त्याच्यासह दिसली होती. दोघांचा हातामध्ये हात घेत चालत येत असलेला आणि गाडीमध्ये बसतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. यामुळे ते दोघे रिलेशनशीपमध्ये असल्याच्या चर्चा सुरू होत्या. लवकरच राघव जुयालचा 'भाई तेरा स्टार है' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहेत. त्याचबरोबर शहनाजचा 'इश्कनाम' सिनेमा रिलीज होणार आहे. यामध्ये तिने पाकिस्तानी मुलीची भूमिका साकारली आहे.

# दीपिकाबरोबरचे नातं संपवल्याचा पश्चात्ताप नाही



कलाकारांच्या रिलेशनशिपची अनेकदा चर्चा होत असते. ते त्यांच्या आयुष्यात पुढे गेले तरी कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांच्या भूतकाळातील नात्यांबद्दल बोलले जाते. काही वेळा स्वत: कलाकार किंवा त्याच्याशी संबंधित व्यक्ती त्यांच्या नात्याबद्दल बोलताना दिसतात. आता दीपिका पादुकोणच्या एक्स बॉयफ्रेंडने त्यांच्या नात्याबद्दल वक्तव्य केले आहे. एक काळ असा होता की, जेव्हा दीपिका पादुकोण आणि मॉडेल व अभिनेता मुझम्मिल इब्राहिम एकमेकांना डेट करीत होते. मात्र, काही काळानंतर हे दोन्ही कलाकार वेगळे झाले. मुझम्मिल अनेकदा दीपिकाबरोबरच्या नात्याबद्दल बोलताना दिसतो. एका मुलाखतीत त्याने दीपिकाबरोबरच्या रिलेशनशिपबद्दल वक्तव्य केले होते. आम्ही वेगळे झालो, त्याचा पश्चात्ताप नाही, असे तो म्हणाला होता. त्याच्या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओसंदर्भात आता मुझम्मिलने त्याच्या इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर केली आहे. त्याने हे स्पष्ट केले की, सध्या जे व्हिडीओ व्हायरल होत आहेत, ते वर्षभरापूर्वीचे आहेत. मुलाखतीत सविस्तरपणे चर्चा झाली होती. सध्या जे व्हिडीओ समोर येत आहेत, त्यामध्ये एडिटिंग केले गेले आहे. दीपिकाचे नाव न घेता, मुझम्मिलने लिहिले की भूतकाळातील लोकांबद्दल बोलताना मी कायम आदराने बोलतो. त्याने लिहिले, मी नेहमीच माझ्या भूतकाळातील व्यक्तींविषयी आदरानं बोलण्याचा प्रयत्न केला आहे आणि आजही माझी तीच भूमिका आहे. मी नेहमीच प्रामाणिकपणे बोलण्यावर विश्वास ठेवतो, तसेच आदरानं माझं मत मांडण्यावरही मी ठाम आहे. एका मुलाखतीत म्हणाला, दीपिकानं मला प्रपोज केलं होतं. पुढे मीच तिच्याशी नातं संपवलं. कोणालाही सोडल्याचा मला कधीच पश्चात्ताप होत नाही. मी खूप कणखर माणूस आहे. त्या काळात मी स्टार होतो; ती नव्हती. ती तेव्हा मॉडेल होती; आज ती सुपरस्टार आहे आणि मला कोणी ओळखतही नाही. मी मात्र तिचा खूप मोठा चाहता आहे. दरम्यान, दीपिका बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. लवकरच, ती शाहरुख खानच्या द किंग या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# ‘दुल्हनिया ले आएगी’मध्ये खुशाली



अभिनेत्री खुशाली कुमारचा आगामी चित्रपट ‘दुल्हनिया ले आएगी’चा फर्स्ट लुक पोस्टर जारी करण्यात आला आहे. या पोस्टरमध्ये खुशाली ही नटलेल्या वधूच्या पोशाखात दिसून येत आहे. याचबरोबर निर्मात्यांनी प्रदर्शनाची तारीखही जारी केली आहे. या फर्स्ट लुकमध्ये खुशाली लाल रंगाच्या ड्रेसमध्ये दिसून येत असून वधूप्रमाणे नटलेल्या खुशालीच्या डोळ्यांवर काळा चष्मा आहे. या पोस्टरमध्ये खुशाली बेडवर पहुडलेली आहे.

दुल्हनिया ले आएगी हा चित्रपट २४ जुलै रोजी प्रदर्शित केला जाणार आहे. या चित्रपटात खुशालीसोबत पियूष मिश्रा आणि महेश मांजरेकर हे कलाकार प्रमुख भूमिकांमध्ये दिसून येतील. या चित्रपटाचे दिग्दर्शन आकाशदित्य लामा यांनी पेले आहे. तर चित्रपटाची निर्मिती सिद्धार्थ बॅनर्जी, आकाशदित्य लामा आणि विकास अग्रवाल यांनी केली आहे.

हा चित्रपट एक कौटुंबिक ड्रामा असेल, ज्यात नातेसंबंध, सणसमारंभ, विवाहाचा आनंद आणि अचानक निर्माण होणाऱ्या मजेशीर स्थितींना दाखविण्यात येणार आहे.

# तब्बू आणि नागार्जून २८ वर्षानंतर एकत्र



अभिनेत्री तब्बूने आजपर्यंत अनेक चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारल्या आहेत. हिंदीसह इंग्रजी, तेलुगू, तमिळ, मल्याळम, मराठी आणि बंगाली चित्रपटांमध्येही तिने काम केलं आहे. तब्बूने १९९८ मध्ये साऊथ स्टार अभिनेते नागार्जून यांच्यासोबत ‘आविदा मां आविदे’ या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. आता तब्बल २८ वर्षानंतर ही जोडी पुन्हा एकदा एकत्र पाहायला मिळणार आहे. ‘किंग१००’ या चित्रपटातून ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे. परंतु, या चित्रपटात तब्बू खलनायिकेच्या भूमिकेत दिसणार असल्याचं बोललं जातं. याधीच्या चित्रपटात तब्बू-नागार्जुनचा लव्ह अँगल पाहायला मिळाला होता, पण यावेळी प्रेम नाही तर दोघांमधील संघर्ष आणि वाद पाहायला मिळतील. दरम्यान, ‘किंग १००’ चित्रपटाबद्दल निर्मात्यांनी अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. मात्र, वृत्तांनुसार, तब्बू या चित्रपटात नकारात्मक भूमिकेत दिसू शकते. यापूर्वी एकत्र काम केल्यामुळे ही जोडी पुन्हा एकदा ऑनस्क्रिन कपल म्हणून एकत्र येईल अशी अनेकांना अपेक्षा होती. मात्र, यात दोघे विरोधी भूमिकेत पाहायला मिळणार आहे. ‘अन्नपूर्णा स्टुडिओज’च्या बॅनरखाली बनत असलेल्या या चित्रपटात नागार्जुन आणि तब्बू यांच्यासोबत सुष्मिता भट्ट देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

# दिशाचे हॉलीवूडमध्ये पदार्पण



बॉलिवूडमधील अभिनेत्री दिशा पाटनीने बॉलीवूड चित्रपटानंतर आता हॉलीवूडमध्ये पदार्पण केले आहे. ती लवकरच ‘हॉलीगार्ड्स सागा- द पोर्टल ऑफ फोर्स’ या चित्रपटातून हॉलीवूडमध्ये पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात दिशा एका अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध अभिनेते, ऑस्कर विजेते केविन स्पेसी करत आहे. एका मुलाखतीत दिशा पटानीने केविन स्पेसी यांच्यासोबत काम करण्याचा आपला अनुभव शेअर केला. ती म्हणाली, ते खरोखरच अप्रतिम आहेत. स्वतः एक अभिनेता असल्यामुळे ते आपल्या कलाकारांना खूप चांगल्या प्रकारे समजून घेतात. तेते आपल्या कलाकारांना मोकळेपणाने काम करण्याची आणि नवीन प्रयोग करण्याची संधी देतात. ते आम्हाला नेहमी सांगायचे की, आपण प्रत्येक सीनला आपल्या वैयक्तिक अनुभवांशी जोडून पाहिले पाहिजे. याशिवाय दिशाने हॉलीवूडमध्ये प्रवेश करण्याच्या आपल्या प्रवासावरही भाष्य केले. ती म्हणाली, हॉलीवूडमध्ये ऑडिशन्सवर खूप जास्त भर दिला जातो. तुम्हाला प्रत्येक भूमिकेसाठी ऑडिशन द्यावीच लागते. नशिबाचाही यात मोठा वाटा असतो, कधीकधी ते फक्त तुमचे जुने काम पाहतात आणि स्वतःहून तुम्हाला प्रोजेक्ट्स किंवा ऑडिशन ऑफर करतात. तिथे काम मिळणे हे व्हिसा आणि इतर गोष्टींवरही अवलंबून असते. यामध्ये अनेक तांत्रिक गोष्टींचा समावेश असतो. तो एक वेगळा देश आहे, त्यामुळे तुम्हाला तिथे प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागते. तुम्ही भारतात राहून तिथे चांगल्या भूमिका मिळवू शकत नाही. तुम्ही इथून ऑनलाईन ऑडिशन नक्कीच देऊ शकता, पण तिथे स्वतः जाऊन काही दिवस राहणे आणि त्यावर काम करणे चांगले आहे. दरम्यान, या चित्रपटात हॉलीवूडचे अनेक मोठे चेहरे एकत्र दिसणार आहेत, ज्यामध्ये स्वतः केविन स्पेसी यांच्यासह डॉल्फ लुंडग्रेन, टायरेस गिब्सन, ब्रायना हिल्डेब्रांड, दिशा पटानी आणि एरिक रॉबर्ट्स यांचा समावेश आहे. या वर्षाच्या सुरुवातीला फेब्रुवारी महिन्यात बर्लिनमध्ये या चित्रपटाचा एक प्रायव्हेट प्रीमियर आयोजित करण्यात आला होता, मात्र याची रिलीज डेट अद्याप जाहीर झालेली नाही.